# नावं आणि आडनावं

तुला जसं नाव आणि आडनाव आहे तशी झाडांनासुद्धा असतात.

-केतकी घाटे



माझं पूर्ण नाव **'मँगीफेरा इंडिका.'** पोर्तुगीज भाषेत मला मांगा म्हणतात म्हणून मँगीफेरा माझं नाव. आणि मी भारत म्हणजे इंडियातला म्हणून माझं आडनाव इंडिका.







माझं पूर्ण नाव **'टॅमरिंडस इंडिका'.** टॅमरिंडस ह्या नावाची फोड 'टॅमर ए हिंद' आहे. पारशी भाषेत टॅमर म्हणजे खजूर. हिंदुस्तानातील खजूर म्हणून माझं नाव ठेवलं टॅमरिंडस इंडिका. ह्या नावांना शास्त्रीय नावं म्हणतात.

हे शब्द तुला वाचता येतील का?

नी३

६नी

J1

G1

गो2

पिं2

वि४

८वण

प्र४

बर७

१० डुलकर

## तात्या, अण्णा, अप्पा, बेबी, नाना, माई, अक्का

**या नावाचे कोण कोण नातेवाईक आई-बाबांना/आजी-आजोबांना आहेत किंवा होते त्यांना विचार.**

मागच्या काळातली ही अगदी कॉमन नावं आता तशी कमीच झाली आहेत. या निमित्ताने या नावाच्या लोकांचे किस्से, गमती मुलांना सांगू या.